**महाराष्ट्र शासन**
**विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग**
**मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, नाशिक रोड - 422101**
**दूरध्वनी क्र. :** 0253-2461439 **Email : dycomplan.nashik@maharashtra.gov.in**
**विभागाचे नाव : नियोजन शाखा** **संकलन : कुंभमेळा**

प्रति,

मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती, नाशिक.

विषय:- दिनांक 17 डिसेंबर 2024 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन दिनांक 17, डिसेंबर 2024 रोजी रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली सिंहस्थ कुंभमेळा सन 2027 अंतर्गत बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीचे इतिवृत्त सोबत पाठविण्यात येत असून मा. विभागीय आयुक्त महोदय यांचे सूचनेनुसार इतिवृत्त आपले कार्यालयाचे स्तरावर सर्व कार्यान्वयीण यंत्रणांना निर्गमित करण्यात येवून इतिवृत्तात नमुद केल्याप्रमाणे त्या-त्या विभागाशी संबंधीत असलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करुन तसा अनुपालन अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा. ही विनंती.

आपला विश्वासू,

सोबत. बैठकीचे इतिवृत्त.

**Signed by Yogendra Ashok Chaudhari**
**Date: 22-12-2024 17:47:11**

(योगेंद्र चौधरी)
उपआयुक्त (नियोजन)
नाशिक विभाग, नाशिक

**दिनांक 17, डिसेंबर 2024 रोजी विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष, जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती, नाशिक विभाग, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली सिंहस्थ कुंभमेळा बाबत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

डॉ. प्रवीण गेडाम, विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष, जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती, नाशिक विभाग, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक 17, डिसेंबर, 2024 रोजी सायंकाळी 05:00 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळा सन 2027 चे नियोजनाबाबत बैठक संपन्न झाली. सदर बैठकीसाठी खालील व इतर अधिकारी उपस्थित होते.

- श्री. जलज शर्मा, जिल्हाधिकारी, नाशिक.
- श्री. आदित्य मिरखेलकर, अपर पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण.
- श्रीमती अरुंधती शर्मा, अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक.
- श्रीमती स्मिता झगडे, अपर आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक.
- श्री. योगेंद्र चौधरी, उपआयुक्त (नियोजन), नाशिक विभाग, नाशिक.
- श्री. चंद्रकांत खांडवी, पोलीस उपआयुक्त, नाशिक शहर.
- श्री. राजेंद्र वाघ, निवासी उपजिल्हाधिकारी, नाशिक.
- श्री. सुमंत मोरे, मुख्य कार्यकारी अधिकारी, Nashik Municipal Smart City Development Corporation Limited (NMSCDCL).
- श्रीमती श्रीया देवचके, मुख्याधिकारी, त्र्यंबकेश्वर नगर परिषद, त्र्यंबकेश्वर.

बैठकीच्या सुरुवातीला श्री. जलज शर्मा, जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती, नाशिक यांनी बैठकीस उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष, जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती, नाशिक विभाग, नाशिक यांनी बैठकीच्या विषयांची पार्श्वभूमी विषद केली. सदर बैठकी दरम्यान पुढील प्रमुख मुद्यांवर चर्चा झाली.

| अ.क्र. | बैठकीत दिलेल्या सूचना | कार्यवाही करणारे विभाग |
|---|---|---|
| 01 | नाशिक महानगरपालिकेने सर्व विभागांना पार्किंग बाबतचे सादरीकरणाची प्रत द्यावी व सर्व विभागांनी अभ्यास करुन त्यांचे अभिप्राय द्यावेत आणि सर्वसमावेशक नियोजन करावे.<br>सर्व विभागांनी कुंभमेळ्याचे कामकाज करण्यासाठी व सुरळीत समन्वयासाठी आपआपल्या विभागाची माहिती इतर विभागांना देखील पाठविणे आवश्यक आहे. (उदा. पूर्ण कामे, स्थळांची केलेली पाहणी, वाटप केलेली वाहनतळे, मॅप केलेले CCTV, गर्दीचा मार्ग व नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे येणारी लोकांची संभावित गर्दी, इ.)<br>सन 2015 च्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या वेळी क्षेत्रनिहाय पार्किंग (area wise) व गंतव्य पार्किंग (destination parking) मध्ये पार्क करण्यात आलेल्या एकूण वाहनांच्या संख्येची माहिती शोधण्यात यावी.<br>समृध्दी महामार्गाद्वारे नाशिक शहराकडे येणाऱ्या संभावित वाहतुकीचा विचार करुन पार्किंगची व्यवस्था व वाहतुकीचे नियोजन करावे. | नाशिक महानगरपालिका, सां.बा.विभाग, नप त्र्यंबकेश्वर, पोलीस विभाग (शहर व ग्रामीण) व इतर सर्व विभाग |

| अ.क्र. | बैठकीत दिलेल्या सूचना | कार्यवाही करणारे विभाग |
|---|---|---|
| | पोलीस विभागाने सर्व वाहनतळांची, घाटांची आणि संबंधित मार्गांची पाहणी करावी व सर्व माहिती संकलित करुन वाहतुक नियोजनास सुरुवात करावी. | |
| 02 | पार्किंगवर सार्वजनिक शौचालय, किचन व इतर सुविधांचा समावेश करावा. | सां.बा.विभाग, नाशिक महानगरपालिका व नप त्र्यंबकेश्वर |
| 03 | नवीन अतिरिक्त घाट बांधण्यासाठी जागा आहे किंवा कसे? या बाबत अभ्यास करण्यात यावा. | नाशिक महानगरपालिका व जलसंपदा विभाग |
| 04 | गोदावरी नदीच्या दोन्ही बाजुला पालखी मार्गाची (पादचारी + सायकल) व्यवहार्यता (feasibility) तपासण्यात यावी. | नाशिक महानगरपालिका, जलसंपदा विभाग व NMRDA |
| 05 | सन 2015 च्या सिंहस्थ कुंभमेळासाठी NIC ची वेबसाईट तयार करण्यात आली होती. सदर वेबसाईट वर उपलब्ध असलेली माहिती (ऑनलाईन किंवा ऑफलाईन) व फाईलस् शोधण्यात यावी. | जिल्हाधिकारी, नाशिक |
| 06 | GIS वर पार्किंग बाबत सर्व विभागांची माहिती नोंदवण्यात यावी. तसेच GIS बाबत सर्व संबंधित विभागांना युजर इंटरफेस उपलब्ध करुन देण्यात यावा. | नाशिक महानगरपालिका, NMSCDCL व इतर सर्व विभाग |
| 07 | त्र्यंबकेश्वर ला जाण्यासाठी छत्रपती संभाजीनगर, पुणे, मुंबई, धुळे इत्यादी कडून तसेच रेल्वेने आलेली लोकं नाशिक शहरामधून किंवा बाहेरुन कसे जाणार या बाबत नकाशा तयार करुन सुयोग्य नियोजन करण्यात यावे व तयार करण्यात आलेल्या नकाशाचे सादरीकरण करण्यात यावे. | सां.बा.विभाग |
| 08 | श्री क्षेत्र प्रयागराज येथील कुंभमेळा संपल्यानंतर सर्व संत/ महंत यांचेसोबत नाते बांधणीची बैठक (ice breaking / relationship building meeting) आयोजित करण्यात यावी. | जिल्हाधिकारी, नाशिक. |
| 09 | सर्व विभागांनी सर्वोच्च प्राधान्याच्या (topmost priority) कामांची अंदाजपत्रके तयार करणे, निविदा बाबतची कागदपत्रे तयार करण्यास सुरुवात करावी. सर्व कामांच्या अंदाजपत्रकामध्ये गुणवत्ता नियंत्रण बाबत तरतुद करण्यात यावी. तसेच रस्ते स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, कचरा उचलण्याची व्यवस्था व स्वच्छतागृह साफसफाईची सूचना (toilet cleaning pointers) यांचा समावेश करण्यात यावा. | सर्व विभाग |
| 10 | नवीन **CCTV** कॅमेरे बसवताना नाशिक स्मार्ट सिटीने (NMSCDCL) बसवलेल्या **CCTV** कॅमेऱ्यांच्या स्थळांचा (location) चा विचार करुन त्यातील अंतर (Gaps) लक्षात घ्यावे व त्याप्रमाणे नवीन **CCTV** कॅमेऱ्यांची गरज पूर्ण करावी.<br>त्र्यंबकेश्वर नगर परिषदेने **CCTV** कॅमेरेसाठी केलेले प्राथमिक नियोजन व पार्किंग बाबत केलेले नियोजन पुढील बैठकीत सादर करावे. | NMSCDCL, नाशिक शहर पोलीस, नप त्र्यंबकेश्वर व नाशिक ग्रामीण पोलीस |
| 11 | सर्व विभागांनी त्यांचे विभागाअंतर्गत करण्यात येत असलेल्या कुंभपूर्व कामांना गती देवून ती लवकरात लवकर पूर्ण करुन घ्यावी व सदरची कामे | सर्व विभाग |

| अ.क्र. | बैठकीत दिलेल्या सूचना | कार्यवाही करणारे विभाग |
|---|---|---|
| | कुंभमेळ्याच्या कामांमध्ये आच्छादित (overlapping) होणार नाही याची दक्षता घ्यावी. | |
| 12 | सार्वजनिक घोषणा प्रणाली (public address system) ची ठिकाणे निश्चित करताना अस्तित्वातील प्रणालीचा विचार करुन आणि अंतर ओळख (gaps identify) करुन अनेक विभागांसाठी एकत्रित पायाभुत सुविधांची निर्मिती कशी होईल हे पहावे. | NMSCDCL, नाशिक महानगरपालिका, नाशिक शहर पोलीस, नप त्र्यंबकेश्वर व नाशिक ग्रामीण पोलीस |

याशिवाय इतरही सूचना देण्यात आल्या व त्यानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देवून मा. अध्यक्ष यांचे परवानगीने बैठक समाप्त झाल्याचे जाहीर करण्यात आले.

Signed by
Praveen Nilkanthrao Gedam
Date: 22-12-2024 17:28:20

(डॉ. प्रवीण गेडाम)
विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष,
जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती,
नाशिक